महाराष्ट्राचा शेक्सपीअर

अर्थात्

महाराष्ट्रभाषाविभूषण

गोविंदाग्रज व बाळकराम

उर्फ

प. वा. राम गणेश गडकरी यांची

सुप्रसिद्ध

# मुरली

REFBK-0019444
REFBK-0019444

दत्तराम रंगनाथ उपासक

सुबोध-साहित्य-संग्रह,

बुधवार, ५०२, पुणें सिटी.

REFBK-0019444
REFBK-0019444
सं का १०५ ५८

# मुरली.

—:*:—

[ प्रीति, भक्ति आणि मुक्ति या भावयोगाच्या तीन पायऱ्या आहेत. प्रीतीच्या परमोच्च स्थितीवरच भक्तीचें पहिलें पाऊल उमटून, भक्तीच्या मोकळ्या भरारींत भक्तभगवंतांचें पूर्णैक्य होत असतें, हें दाखविण्यासाठीं, स्त्रीहृदयाचें प्रेमळ रहस्य ओळखून भागवतकवीनें 'राधागौळण' कृष्ण-परमात्म्यासमोर उभी केलेली आहे. जगाच्या भूतकाळांत, भोळ्याभाबड्या भक्तिप्रीतीच्या संयोगाचें इतकें ठळक चित्र याव्यतिरिक्त इतरत्र सांपडणार नाहीं. म्हणून या गीतांत भक्तजीवात्मा राधारूपानें दाखवून प्रीति-भक्तीच्या बदलत्या सीमारेषेवर त्याची स्थापना केली आहे. मनुष्याच्या आयुष्यांत असा एक काळ एकदांतरी येतोच, कीं, ज्या वेळीं ईश्वराचें अस्तित्व **भावपूर्ण हृदयाला पटतें** आणि तेव्हां मात्र, **बुद्धिप्रधान मस्तकाचें समाधान** करण्यासाठीं तळमळणारा जीवात्मा ईश्वरी साक्षा-त्काराची—प्रत्युत्तराची—याचना करीत असतो. हें दैवी प्रत्युत्तर त्या योग्य वेळीं मिळालें नाहीं म्हणजे मात्र मनुष्य पुन्हा भोंवऱ्यांत गुरफटतो. या गाण्यांत अशा ईश्वरी उत्तराला 'मुरलीध्वनि' कल्पून त्यासाठीं झुरणाऱ्या राधेच्या पांच चढत्या स्थिति ( कडवीं ) १४।१८।२१।३२।३७ दाखवि-ण्याचा प्रयत्न केलेला आहे.—**'गोविंदाग्रज'** ].

ही एक आस मनिं उरलि ॥ कन्हय्या ! बजाव बजाव मुरली॥धृ०॥
जरि फुटले दोनी कान ॥ नच राही भूक तहान ॥
तिळभरही नुरलें भान ॥ बघ वृत्ति वृत्तिमधिं मुरलि ॥ १ ॥
कां गाणें मजला व्हावें ॥ चित्तासहि नाहीं ठावें ॥
दृष्टीला केविं दिसावें ॥ मम आस नसे परि पुरलि ॥ २ ॥
मी अगदीं भोळी राधा । तूं माधवजी ! नच साधा ॥
मोहनी करी सुखबाधा ॥ तव ...

तीनेंच शब्द मम निघती ॥ जग फिरुनि, फिरुनि मनिं रिघती ॥
मज आतां दुसरी न गति ॥ जगतीच सारि जणुं जिरलि ॥ ६ ॥
अणुरेणुहि देहीं स्वैर ॥ भिन्नता विसरलि वैर ॥
अब नंदलाल ! कर खैर ॥ प्रेमाची दुनिया उरलि ॥ ६ ॥
बुद्धीचा तुटला धीर ॥ आशामय होय शरीर ॥
जलिं बुडे जलधिचें तीर ॥ बघ, बघतां दृष्टिहि विरलि ॥ ७ ॥
कथुं काय, काय मज वाटे ॥ आनंद मात्र मनिं दाटे ॥
तरुशिरीं मूळ उफराटें ॥ शून्यांत परार्धें भरलिं ॥ ८ ॥
जन्माचें झालें चीज ॥ कायमची मेली नीज ॥
विश्वाचें गवसे बीज ॥ चिद्वृत्ति त्यांत अवतरलि ॥ ९ ॥
मायेची मेली बिजली ॥ परि खऱ्या जलीं ती विझली ॥
तीव्रता तियेची थिजली ॥ सुकलेलीं विश्वें भिजलिं ॥ १० ॥
कोसळति सरीवर सरी ॥ लहरीवर उठती लहरी ॥
अश्रूंची गरदी भारी ॥ अवकाशें तुडुंब सगळिं ॥ ११ ॥
पुष्पाविण येई वास ॥ वाऱ्याविण चाले श्वास ! ॥
हर्षाविण आतां हास ॥ मरणाविण सुटका झालि ॥ १२ ॥
ब्रह्मगोल त्वन्मय झाला ॥ चहुंकडेच मुरलीवाला ॥
त्वद्रूप गोपिकाबाला ॥ मी मला शून्य या कालिं ॥ १३ ॥
सांवळ्या ! यशोदाबाळा ॥ बंधाला पडला आळा ॥
स्वैराचा वाढे चाळा ॥ बावरी राधिका बनलि ॥ १४ ॥
किति करूं कन्हय्या ! धांवा ॥ गा, नाच, वाजवीं पांवा ॥
त्यांतच हा जीव विरावा ॥ यावांचुनि इच्छा नुरलि ॥ १५ ॥
एकेक ऐकुनी सूर ॥ दुःखाचा हो जरि चूर ॥
सारखी तरी हुरहूर ॥ न कळे ही लागे कसलि ॥ १६ ॥
तूं मनांतला चंडोल ॥ मग माझ्या मनिंचे बोल ॥
जरि हृदयीं लपले खोल ॥ तरि खोल हृदय या कालिं ॥
बोल, बोल तव बिनमोल ॥ जीवाचें देइन मोल ॥
परि बोल एकदां बोल ॥ नातरी राधिका मुकलि ॥ १८

फिर विश्वाचा हा गोल ॥ सांभाळुनि माझा तोल ॥
प्रेमाचा धरूनी सोल ॥ बघ मागुति राधा आलि ॥ १९ ॥
मुरलीची प्यालें भांग ॥ घडिघडी थरारे अंग ॥
या लहरि उठति कां सांग ॥ आनंदवृत्ति पाझरलि ॥ २० ॥
उलगडति पीळ हृदयाचे ॥ जणुं सुटति बंध देहाचे ॥
कीं जीव देहभर नाचे ॥ कुणिकडे राधिका भकलि ॥ २१ ॥
ही लहर अशा देहाची ॥ हालचाल आनंदाची ॥
चेतनाच कीं जीवाची ॥ तुज भेटाया जणुं आलि ॥ २२ ॥
तिजमुळें होउनी दंग ॥ वाऱ्यांत तरंगे अंग ॥
अणुअणुही होति दुभंग ॥ त्यांमाजि नादवी मुरलि ॥ २३ ॥
हृदयाचे ठोके पडती ॥ अवकाश त्यांत जे उरती ॥
करि मुरलिरवाची भरती ॥ मग एकच धडकी सगळि ॥ २४ ॥
मुरलीचा मंजुळ नाद ॥ हृदयांत खुलवि पडसाद ॥
मम जीवाची ही साद ॥ तुज हांका मारित सुटलिं ॥ २५ ॥
सारखा मुरलि वाजीव ॥ अणुअणुसि देहिं दे जीव ॥
त्यांमाजि नाद गाजीव ॥ हृदयाचे पडदे उकलिं ॥ २६ ॥
जीवाच्या कमळा भुलवीं ॥ निजगुंजारविं त्या डुलवीं ॥
पाकळी पाकळी खुलवीं ॥ झुलवीं त्या पाडुनि भुरळि ॥ २७ ॥
कृष्णजी ! त्यांत तूं भृंग ॥ त्यांतच रे होई गुंग ॥
गुंजारव करिं उत्तुंग ॥ ही मोहरात्र ओसरलि ॥ २८ ॥
चांदणें खुले दिलरंगीं ॥ हो एक नादरसरंगीं ॥
पोहत मी स्वैर तरंगीं ॥ बघ शुद्धबुद्ध मम हरलि ॥ २९ ॥
या रसीं देहकण न्हाले ॥ जो तो निजनादीं डोले ॥
क्षणभरांत सारे फुलले ॥ बघ फुलें तयांचीं झालिं ॥ ३० ॥
करुनि त्या फुलांचा झेला ॥ जीवाचा छेलछबेला ॥
टवीन कधीं अलबेला ॥ [illegible]
गंगा

४५-१४०

वांकड्या अधरिं हा पांवा ॥ वांकडाच डोळा डावा ॥
किति वेळ असाच पहावा ॥ अब खेल करो बनमालि ! ॥३३॥
श्वासें मज हृदयीं भरवी ॥ नादें कीं ओढुनि नेई ॥
चुंबनेंच कीं मज बनवी ॥ तव ओंठावरली लालि ॥ ३४ ॥
दृढ आलिंगन दे अथवा ॥ अवकाश न त्यांत असावा ॥
एकरूप जीवाभावां ॥ तव देहिं देह मम जिरविं ॥ ३५ ॥
बघ आतां घटका भरली ॥ बोलाची बोली सरली ॥
जीवाची भाषा हरली ॥ ठायींच वृत्तिही हरलि ॥ ३६ ॥
जीवाचा पंची प्यारा ॥ मज आतां दिसासि न्यारा ॥
मुरलीचा पिउनी वारा ॥ चहुंकडेच राधा झुकलि ॥ ३७ ॥
उरलें न शीत वा उष्ण ॥ कांहीं न शुभ्र वा कृष्ण ॥
एकरूप राधाकृष्ण ॥ जयनाद गात ही मुरलि ॥ ३८ ॥
चहुंकडेच आतां शांत ॥ विश्व शांत, आत्मा शांत ॥
कृष्ण शांत, राधा शांत ॥ मुरलींत शांतता भरलि ॥ ३९ ॥
भोगुनी तापमय उष्णा ॥ मुरलिची लागतां तृष्णा ॥
जग गाइल राधाकृष्णा ॥ ही साक्ष मनोमन मुरलि ॥ ४० ॥
ही अखंड मुरली वाजे ॥ सर्वांच्या हृदयीं गाजे ॥
मग कोण वदाया लाजे ॥ कीं धन्य धन्य ही मुरलि ॥ ४१ ॥
त्या नादरसाचे प्याले ॥ मनिं **'गोविंदाग्रज'** प्याले ॥
शाहीर मुरलिचे बनले ॥ मग गानिं वाजविति मुरलि ॥ ४२ ॥

---

REFBK-0019444
REFBK-0019444

—भालचंद्र त्रिंबक तिखे
बुधवार, ५०२, पुणें.

॥

मुद्रकः—रामचंद्र नारायण लाड
" श्री शिवाजी प्रिंटिंग प्रेस " सदाशिव, ५५६, पुणें

# आमचे दुकानीं

## कोणतेही पुस्तक फायदेशीर भावानें मिळतें. दुसरीकडे घेण्यापूर्वीं एकवार आमचेकडे जरूर चौकशी करावी.

## शिवाय

१॥. रु. ( डिपाझिट ) ठेविल्यास दरमहा १ आणा फी घेऊन आमचे दुकानांतून पुस्तकें घरीं वाचण्यास मिळतात.

ही मुदत आठ दिवसांपुरतींच आहे !

आतां फक्त २३ मेंबर पाहिजेत. अधिकास सवड नाहीं.

---

# अखिल ब्रम्हांडाची सफर !

अत्यंत रमणीय विनोदी लेख. किं. २ आणे.

---

## सुबोध-साहित्य-संग्रह,

( किर्लोस्कर थिएटरासमोर )

बुधवार, ५०२, पुणें.